मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# एम्पायर इस्टेट उड्डाणपुलाचा लूप लवकरच सुरु

## वाहतूक पोलिस करणार पाहणी : चिंचवड लिंक रस्त्यावरची वाहतूक कोंडी सुटणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड स्टेशन नजीकच्या संत मदर तेरेसा (एम्पायर इस्टेट) उड्डाणपुलावर चढणे आणि खाली उतरण्यासाठी दोन लूप (रॅम्प) तयार करण्यात येत आहे. या रॅम्प कामाचे 95 टक्के पूर्ण झाले आहे. हे दोन्ही रॅम्प वाहतुकीस खुले करण्यात येणार आहे. त्यामुळे चिंचवड लिंक रोडची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी निश्चित मदत होणार आहे. काही किरकोळ कामे अपूर्ण आहेत. ते लवकरच पूर्ण होतील. त्यानंतर वाहतूक विभागाकडून त्याची पाहणी झाल्यानंतर तो सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वाधिक लांबीचा उड्डाणपूल असणाऱ्या संत मदर तेरेसा (एम्पायर इस्टेट) उड्डाणरपुलावर चिंचवड लिंक रोड येथे उतरणे व पुलावर वाहनांना येण्यासाठी तयार केलेल्या लूपचे (रॅम्प) काम 95 टक्के पूर्ण झाले आहे. सर्व काम पूर्ण होवून दोन्ही बाजूकडखील लूप सुरु केल्यानंतर चिंचवड लिंक रस्त्यावरील भाटनगर, चिंचवड येथील पीएमपीएमएल बस स्थानक चौकात होणारी वाहतूक कोंडी आटोक्यात आणण्यात यश येणार आहे.

> चिंचवडच्या एम्पायर इस्टेट उड्डाणपुलावरुन चढणे व उतरण्यासाठी दोन्ही बाजूला बांधलेल्या लूपचे (रॅम्प) काम प्रगतिपथावर आहे. दोन्ही लूपचे काम जवळपास पूर्णत्वास आले आहे. वाहतूक विभागाकडून त्याची पाहणी झाल्यानंतर त्यावर निर्णय घेण्यात येईल.
>
> **- विजय भोजने, कार्यकारी अभियंता, महानगरपालिका.**

तर, काळेवाडी येथून पिंपरी आणि चिंचवडच्या मुख्य बाजारपेठेत जाण्याची पर्यायी सोय होणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने 2012 मध्ये बस रॅपीड ट्रान्झीट सिस्टीम (बीआरटी) हे वेगाने बसेस धावण्याचे मार्ग तयार केले. या मार्गावर काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी बीआरटी रस्त्यावर चिंचवड येथील एम्पायर इस्टेट येथे संत मदर तेरेसा हा दोन किलोमीटर अंतराचा उड्डाणपूल आहे.

सध्या या उड्डाणपुलाचा पिंपरी कॅम्प आणि चिंचवडमधील नागरिकांना फायदा होत नसल्याचे उड्डाणपुलावरुन लूप तयार करण्याची मागणी केली. त्यावर महापालिकेने उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजुला लूप तयार करण्याचे काम 2020 मध्ये हाती घेतले. सध्या लूपचे काम 95 टक्के पूर्ण झाले असून महिनाअखेर उर्वरीत काम पूर्ण करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# मुळा नदी सुधारविषयी तातडीची बैठक घ्या

## पिंपरी चिंचवडमधील संघटनांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट : आमदार गोरखे यांचा पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

नदी सुधारच्या नावाखाली मुळा नदीपात्र अरुंद केले जात आहे. त्यास पिंपरी- चिंचवड शहरातील पर्यावरणवादी संघटनांनी विरोध दर्शवला आहे. या संदर्भात शहरातील संघटनांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. नदीचे पात्र अरुंद होत आहे, पुराची परिस्थिती निर्माण होईल, याविषयी माहिती दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका आणि जलसंपदा विभागाला तातडीने बैठक घेण्याची सूचना केली आहे.



पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या सीमेवर असणाऱ्या मुळा नदीचे सुशोभीकरण सुरु आहे. सिमेंटीकरण सुरु आहे. त्यास पर्यावरणवादी संघटनांनी विरोध दर्शवला आहे. नदीकाठचे काँक्रीटीकरण थांबवून पूर थांबवण्यासाठी आणि नद्या स्वच्छ करण्यासाठी नदी बचाव शिष्टमंडळाने आज मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. शिष्टमंडळामध्ये विधान परिषद सदस्य अमित गोरखे, ज्येष्ठ पर्यावरणवादी धनंजय शेडबाळे, जलबिरादरीचे नरेंद्र चुघ, सामाजिक कार्यकर्ते बाबा भोईर, पिंपरी- चिंचवड सिटीजन फोरमचे तुषार शिंदे आदी उपस्थित होते.

आमदार अमित गोरखे म्हणाले, 'पिंपरी- चिंचवड शहरातील पर्यावरणवादी संघटनांच्या आंदोलनामध्ये सहभागी होऊन त्यांची नदी सुधारविषयी भूमिका काय? हे समजून घेतले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली आणि पर्यावरणवादी संघटना आणि मुख्यमंत्री अशी भेट घडवून आणली. नदी सुधारमुळे ३८ टक्के नदीपात्र अरुंद होणार आहे, ही बाब शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिली. तरीही महापालिका हा प्रकल्प रेटत आहे हे नमूद केले. नदी सुधारविषयी असणाऱ्या पर्यावरणवाद्यांच्या सूचनांचा अंतर्भाव कराव्यात. याबाबत तातडीची बैठक घ्यावी, याविषयीच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी केले आहे.'

# विद्यापीठ चौकातील ग्रेड-सेपरेटरला मंजुरी

## लांबी कमी केल्याने खर्चात 30 कोटींची बचत होणार : काही दिवसातच होणार काम सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात विविध संस्थांच्या माध्यमातून प्रकल्प सुरु आहेत. शहरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिक चांगलेच त्रासले आहेत. ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना केल्या जातात. शहरातील वाहतुकीच्या दृष्टिने महत्वाच्या असलेल्या विद्यापीठ चौकात ग्रेड-सेपरेटर बांधण्यात येणार आहे. या प्रस्तावित प्रकल्पाच्या कामाच्या पूर्वगणक पत्राला शुक्रवारी (दि.११) महापालिकेच्या इस्टीमेट कमिटीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली.

सिमला ऑफिस बाजूने औंध भागात जाणाऱ्या या ग्रेड-सेपरेटरची लांबी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे खर्चामध्ये ३० कोटींची बचत होणार असून सेनापती बापट रस्त्याने येणारी वाहतूकीला ग्रेड सेपरेटरचा वापर करता येणार आहे. वाहतूक सोडविण्यासाठी पालिका, शहर वाहतूक पोलीस आणि पीएमआरडीएकडून विविध कामे केले जात आहेत. शहरातील सर्वाधिक गर्दीचा गणेशखिंड रस्त्यावरची वाहतूक सुरळीत करण्यासाठी विद्यापीठ चौकात दुमजली उड्डाणपूल उभारण्याचे काम लवकरच पूर्ण होणार आहे. यामुळे पाषाण आणि बाणेर दिशेने जाणाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विद्यापीठ चौकात ग्रेड-सेपरेटर उभारण्याचेदेखील नियोजन आहे. दुमजली उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर ग्रेड-सेपरेटरचे काम सुरू करण्याचा निर्णय घेतलेला होता. सध्या उड्डाणपुलाचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे, त्यामुळे ग्रेड-सेपरेटरचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. यासाठी ट्रैफिक पोलिसांनी देखील पालिकेला पत्र पाठविले आहे.




### सेनापती बापट रस्त्यावरील वाहतूकीला देखील फायदा

» पालिकेकडून उभारण्यात येणाऱ्या ग्रेड-सेपरेटरच्या प्रस्तावावर शुक्रवारी पालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या इस्टीमेट कमेटीच्या बैठकीत चर्चा झाली. आधीच्या प्रस्तावानुसार ग्रेड-सेपरेटर गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक येथून सुरू होणार होता. त्यामध्ये सेनापती बापट रस्त्यावरील वाहतूक जोडण्याचा प्रस्ताव नव्हता. मात्र यामध्ये बदल करून सेनापती बापट रस्त्यावरील वाहतूकीला देखील या ग्रेड-सेपरेटरचा वापर करता यावा यासाठी ग्रेड-सेपरेटरची लांबी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या ग्रेड-सेपरेटरचे काम नव्या तंत्रज्ञानाने करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास होणार नाही. पालिकेतर्फे अत्यंत वेगाने हे काम करण्याचे ठरविण्यात आले आहे. काम पूर्ण करण्याच्या मुदतीच्या आधीच ग्रेड-सेपरेटर काम करून नागरिकांना खुला करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. ग्रेड-सेपरेटरची लांबी ३०० मीटरने कमी केल्याने खर्चामध्ये ३० कोटी रुपयांची बचत होणार आहे.

# खडकी रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासाचे काम अंतिम टप्प्यात

## दक्षिणेकडे गाड्या सोडण्याचे नियोजन : येत्या दोन महिन्यांत हे काम पूर्ण केले जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

खडकी रेल्वे स्थानक हे 'कोचिंग टर्मिनल' म्हणून विकसित करण्यात येत असून, येत्या दोन महिन्यांत हे काम पूर्ण केले जाणार आहेत. त्यानंतर या स्थानकावरून चेन्नई आणि बंगळुरू या प्रमुख ठिकाणांसह दक्षिणेकडे रेल्वे गाड्या सोडण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाने केले आहे. त्यामुळे पुणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी होणार आहे.

मध्य रेल्वेच्या पुणे विभागीय रेल्वे स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी खडकी आणि हडपसर या रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. खडकी स्थानकाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या दोन महिन्यांत हे काम पूर्ण झाल्यानंतर या स्थानकावरून लांब पल्ल्याच्या गाड्या सोडण्यात येणार आहेत. त्यामुळे पुणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी होऊन प्रतीक्षेतील गाड्यांच्या वेळापत्रकात सुसूत्रता आणणे शक्य होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

सद्य:स्थितीत पुणे रेल्वे विभागाच्या मुख्य स्थानकावरून लांब पल्ल्याच्या आणि बाहेरून येणाऱ्या १२० ते १५० गाड्या धावतात. या गाड्यांतून एक लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात. गर्दी वाढत असल्याने पायाभूत सुविधा कमी पडत आहेत. त्यामुळे रेल्वे विभागाने खडकी आणि हडपसर या स्थानकांसह अन्य स्थानकांवर पुनर्विकासाची कामे हाती घेतली आहेत. त्यापैकी खडकी रेल्वे स्थानक हे 'कोचिंग टर्मिनल' म्हणून विकसित करण्यात येत आहे. या स्थानकांच्या फलाटांची उंची वाढविण्यात येणार आहे. या कामांसाठी रेल्वे बोर्डाकडून ३५ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. खडकी रेल्वे स्थानकावरून चेन्नई आणि बंगळुरू या प्रमुख ठिकाणांसह दक्षिण भागात रेल्वे गाड्या सोडण्याचे नियोजन असून, लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा फायदा होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.



> खडकी रेल्वे स्थानकावरील पुनर्विकासाचे काम सुरू आहे. त्यामध्ये फलाट क्रमांक तीनची उंची वाढविण्यात येणार आहे. प्रवाशांसाठी पायाभूत सुविधा पुरविल्या जाणार आहेत. दोन ते अडीच महिन्यांत ही कामे पूर्ण होतील. त्यानंतर या स्थानकावरून लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू करण्यात येतील. त्या दृष्टीने वेळापत्रक तयार करण्यात येत आहे.
>
> – हेमंतकुमार बेहरा, जनसंपर्क अधिकारी.

### पुणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी

» पुणे स्थानकावरून सोडण्यात येणाऱ्या रेल्वे गाड्यांची संख्या जास्त असल्याने आणि गर्दीमुळे अनेकदा गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होतो. अनेक गाड्यांना विलंब होतो. हा विलंब टाळण्यासाठी खडकी रेल्वे स्थानकावरून गाड्या सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे प्रतीक्षेत असणाऱ्या गाड्यांचे प्रमाण कमी होऊन पुणे रेल्वे स्थानकावरील ताणही कमी होणार आहे.

# नळजोडणीवरील पाण्याच्या मीटरची वाढली

## पितळ, ब्रॉंझपासून बनवलेल्या मीटरला भंगारात चांगले दर; चोरट्यांनी पाण्याच्या मीटरवर केले लक्ष केंद्रित

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील सोसायट्यांमध्ये नळजोडणीवरील पाण्याच्या मीटरची चोरी वाढली आहे. हे मीटर पितळ आणि ब्रॉंझ धातूपासून बनवलेले असते. त्याला भंगारमध्ये चांगले पैसे मिळतात. त्यामुळे चोरट्यांनी या मीटरवर लक्ष केंद्रीत केल्याचे दिसत आहे. समाविष्ट गावातील विविध सोसायट्यांमध्ये मीटर चोरीचे प्रमाण वाढल्यामुळे सोसोटीधारकांना ऐन उन्हाळ्यात पाण्याच्या संकटासहित आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

सोसायटीतील १२ फ्लॅटच्या पाठीमागे कमीत कमी एक इंची कनेक्शन दिले जाते. त्यानुसार एका विंगमध्ये किती फ्लॅट आहेत आणि एकूण स्कीममध्ये एकूण फ्लॅटची संख्या पाहून नळजोडणी करण्यात येते. त्यावर सोसोयटीधारकांनी किती पाणी वापरले आहे, त्याचे मोजमाप करण्यासाठी त्या नळजोडणीवर पाणी पुरवठा विभागाच्या वतीने मीटर जोडले जातात. हे मीटर पितळ किंवा ब्रॉंझ धातूचे बनवलेले असतात. त्यामुळे एक मीटरची किंमत अंदाजे ६ ते ७५०० रुपये एवढी असते. आणि ती बसवण्यासाठी जवळपास अडीच ते तीन हजार असे एकूण नऊ ते दहा हजार रुपये मोजावे लागतात, अशी माहिती यामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने दिली आहे.

हे मीटर ज्या धातूपासून बनवतात त्या पितळ आणि ब्रॉंझ धातूला भंगारमध्ये एका किलोमागे किमान ४५० ते ६०० रुपये भाव मिळत असल्याची माहिती आहे. त्यामुळे चोरट्यांनी या मीटरवर लक्ष केंद्रित केले आहे. भोसरी विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या समाविष्ट गावामध्ये मोठमोठे गृहप्रकल्प उभे राहिले आहेत. त्याठिकाणी फ्लॅट्सची संख्या मोठी असते. त्याअनुषंगाने येथे पाण्याचे नळजोड आणि त्यावरील मीटरची संख्या ही जास्त असल्याचे पाहावयास मिळत आहे. मोठे गृहप्रकल्प असणाऱ्या सोसायट्यांमध्ये लक्ष ठेवून नळजोडणीवरील मीटर चोरण्यास चोरांनी प्राधान्य दिल्याचे दिसत आहे. मोशी भागातील बारणे वस्ती येथील विविध सोसायट्यांमध्ये चोरीच्या घटना वाढल्या आहेत. त्याचबरोबर पुणे-नाशिक हायवे च्या दोन्ही बाजूच्या सोसोयट्यामध्ये प्रकार घडल्याचे समजते.



### सदनिकाधारकांना आर्थिक भुर्दंड

» रात्रीच्या वेळी चोरटे मीटर चोरी करत आहेत. जलवाहिनीचे नुकसान न करता फक्त जेथे मीटर आहेत ते लॉक उचकटून फक्त मीटर चोरी करणारे हे त्या कलेत तरबेज असणार यात तिळमात्र शंका नाही. मीटर चोरीला गेल्यामुळे त्याठिकाणी दुसरे मीटर बसवण्यासाठी पालिका प्रशासन तगादा लावत आहे. मीटरशिवाय नळजोड असल्यास पाण्याची चोरी होऊ शकते. त्यामुळे सोसायटीधारकांना पाणी पुरवठा विभागाकडून दंड होऊ शकतो, या भीतीने पुन्हा नवीन मीटर बसवण्यासाठीचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

---

# महिंद्रा अँथिया सोसायटीत भटक्या श्वानांवर विषप्रयोग

## नऊपैकी तीन श्वानांचा मृत्यू : अज्ञात व्यक्तीवर कायद्यांनुसार गुन्हा दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील महिंद्रा अँथिया सोसायटीमध्ये भटक्या श्वानांवर विषप्रयोग करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. यातील तीन श्वानांचा मृत्यू झाला असून आता याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीवर बीएनएएस ३२५ आणि प्राण्यांवरील क्रुरतेविरोधातील कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी (दि. १३) रात्री उशिरा हा प्रकार घडला आहे. पिंपरी-चिंचवडमधील मुख्य चौकात ही गृहरचना संस्था आहे. मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय लोकांची गृहरचना संस्था म्हणून ही सोसायटी ओळखली जाते. गेल्या काही दिवसांपासून येथील भटक्या श्वानांना खायला घालण्यावरून दोन गट पडले आहे.

चार दिवसांपूर्वी याच सोसायटीतील काही नागरिकांनी महापालिकेच्या पशु वैद्यकीय विभागात जाऊन तक्रार केली होती. सोसायटीतील भटक्या श्वानांमुळे आम्हाला खाली जाणे अवघड झाले आहे. लहान मुलांना खेळायला पाठवताना अडचणी येत आहेत. वृद्ध नागरिकांवर या श्वानांकडून हल्ले होत आहेत. वाहनांचे नुकसान होत आहे, अशी तोंडी तक्रार येथील नागरिकांनी पशु वैद्यकीय विभागात केली होती. त्यानंतर रविवारी रात्री उशिरा या सोसायटीच्या आवारातील भटक्या श्वानांना खायला घालताना त्यात विषप्रयोग करण्यात आला.

प्राणीहक्क कार्यकर्त्यांनुसार, सोसायटीच्या परिसरात एकूण अकरा भटक्या श्वानांना अज्ञात व्यक्तींनी विष मिसळलेले अन्न दिले. त्यातील तीन श्वान मरण पावली असून उर्वरित सहा श्वानांची प्रकृती गंभीर आहे. मृत श्वानांचे मृतदेह औंध येथील शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालयात तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. दोन श्वानांचे शवविच्छेदन रविवारी करण्यात आले असून नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत. सोसायटीतील रहिवासी व प्राणीप्रेमी मनीष सिंग यांनी काही भटक्या श्वानांना उलटी, जुलाब व शुद्ध हरपण्यासारखी लक्षणे आढळली. आम्ही त्वरित आजारी श्वानांना काळेवाडी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात नेले, त्यांना अँटिडोट व औषधे देण्यात आली. सोसायटीचे क्षेत्र खूप मोठे असल्यामुळे किती श्वानांना विषबाधा झाली आहे आणि किती मरण पावले, हे समजणे कठीण आहे. मात्र, यासंदर्भात संत तुकारामनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे, असे त्यांनी सांगितले.

महेन्द्र अँथिया सोसायटी १४ एकर क्षेत्रफळात पसरलेली आहे, आणि तिथे सुमारे ४० भटके कुत्रे वास्तव्यास आहेत. प्राणीहक्क कार्यकर्त्या आणि 'मिशन पॉसिबल फाउंडेशन'च्या संस्थापक पद्मिनी म्हणाल्या की, निरुपद्रवी प्राण्यांचा ठार मारण्याचा पूर्वनियोजित कट रचून अमानुषपणे हत्या करण्यात आली आहे. अनेक वर्षे सोसायटीत शांततेत राहणाऱ्या या कुत्र्यांचा जीव घेतला गेला आहे. पाच मरण पावले आहेत, आणि उर्वरित गंभीर स्थितीत आहेत.



> “ नऊ श्वानांवर विषप्रयोग करण्यात आल्याची प्राथमिक तक्रार प्राप्त झाली आहे. यातील तीन श्वानांचा मृत्यू झाला असून, अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपासानंतरच हा प्रकार कोणी केला हे स्पष्ट होईल.
>
> **- वनिता धुमाळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संत तुकाराम नगर**

# पुण्यातून 'उत्तर भारत देवभूमि यात्रा' विशेष

## जानेवारी महिन्यात प्रयागराज येथील महाकुंभनिमित्त 'भारत गौरव'ची विशेष रेल्वे सोडण्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

'इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन'कडून (आयआरसीटीसी) सुरू करण्यात आलेल्या पर्यटन रेल्वे सेवेंतर्गत 'उत्तर भारत देवभूमि यात्रा गुरुकृपासह' या विशेष रेल्वेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या गुरुवारी (१७ एप्रिल) पुण्यातून ही विशेष रेल्वे सोडण्यात येणार आहे.ही यात्रा सुमारे पाच हजार किलोमीटर अंतराची असून, हरिद्वार, ऋषीकेश, अमृतसर, वैष्णोदेवी (कटरा), मथुरा, वृंदावन आणि आग्रा यांसारख्या महत्त्वाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक स्थळांना भेट देऊन दहा दिवसांनी ती पुन्हा पुण्यात येणार आहे.

'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वानुसार आरक्षण करण्यात येणार असून, ७५० आसनक्षमता निश्चित करण्यात आली आहे. इच्छुकांना पुणे, लोणावळा, कर्जत, कल्याण, वसई रस्ता, वापी, सूरत, बडोदा या रेल्वे स्थानकांवरून रेल्वेत बसता येणार असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.



दरम्यान, केंद्र शासनाच्या 'देखो अपना देश' या योजनेंतर्गत 'भारतगौरव' ही विशेष रेल्वे सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेद्वारे देशभरातून आतापर्यंत ८६ गाड्या सोडण्यात आल्या आहेत. जानेवारी महिन्यात उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथील महाकुंभनिमित्त 'भारत गौरव'ची विशेष रेल्वे सोडण्यात आली होती. या रेल्वेला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. त्याच धर्तीवर 'उत्तर भारत देवभूमि यात्रा गुरुकृपासह' या विशेष यात्रेचे आयोजन करण्यात आले असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

### प्रवाशांसाठी सुविधा

वातानुकूलित सुविधा आणि राहण्याची व्यवस्था

शाकाहारी भोजन (चहा, नाश्ता, दुपारचे आणि रात्रीचे जेवण)

पर्यटनस्थळी उतरल्यानंतरही वातानुकूलित वाहनाची व्यवस्था

विविध धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांची माहिती देण्यासाठी मार्गदर्शक (गाइड)

### या स्थळांना भेट

- हरिद्वार : ऋषीकेश, हर की पौडी, गंगा आरती
- अमृतसर : सुवर्ण मंदिर, वाघा बॉर्डर
- कटरा : माता वैष्णोदेवी दर्शन
- मथुरा : वृंदावन, श्रीकृष्ण जन्मभूमी आणि प्रमुख मंदिरे
- आग्रा : ताजमहाल

### प्रतिप्रवासी शुल्क

- सामान्य श्रेणी (शयनयान) : रु. १८ हजार २३०
- तृतीय श्रेणी (थ्री टीअर) : रु. ३३ हजार ८८०
- द्वितीय श्रेणी (टू टीअर) : रु. ४१ हजार ५३०

# 140 कोटींच्या 'सुरक्षे'साठी पॉलिटिकल फिल्डिंग

## पालकेला 650 कंत्राटी सुरक्षारक्षकांची कायम पदे मान्य : केवळ 350 सुरक्षारक्षक कार्यरत

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेकडून मुख्य इमारतीसह इतर मालमत्तांच्या ठिकाणी सुरक्षारक्षक नेमले जातात. हे सुरक्षारक्षक कंत्राटी असल्याने मुदत संपल्यानंतर नव्याने दरवर्षी निविदा प्रसिद्ध केली जाते. यंदा पालिकेने दरवर्षीप्रमाणे एक वर्षासाठी नव्हे तर थेट तीन वर्षांसाठी निविदा प्रसिद्ध केली आहे. तब्बल तब्बल १३९ कोटी ९२ लाख रुपयांची ही निविदा आपल्याशी संबंधितांना मिळावी, यासाठी अनेक राजकारण्यांनी फिल्डिंग लावली आहे.

सुरक्षारक्षकांच्या या कंत्राटामध्ये ज्या राजकारण्यांना रस आहे, त्यांच्यासाठी महापालिका प्रशासनाने हा निर्णय घेतला असल्याचा आरोप होत असून ही निविदा पदरात पाडून घेण्यासाठी राजकारण्यांनी फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. कंत्राटी सुरक्षारक्षक पुरविण्यासाठी तीन वर्षांकरिता ही कोट्यवधींची निविदा प्रशासनाने काढली असून ती मिळविण्यासाठी आता राजकीय दमाचा कस लागणार आहे.

पालकेला ६५० कंत्राटी सुरक्षारक्षकांची कायम पदे मान्य आहेत. त्यापैकी केवळ ३५० सुरक्षारक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे अपुऱ्या मनुष्यबळात सुरक्षा विभाग काम करत आहे. पाण्याच्या टाक्या, मैदाने तसेच उद्यानांमध्ये अपुऱ्या मनुष्यबळाअभावी सुरक्षारक्षक पुरवणे सुरक्षा विभागाला शक्य होत नाही. त्यात आता पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थिनींना सेवा देणाऱ्या पीएमपी बसमध्ये महिला सुरक्षारक्षक नेमावे लागणार आहेत. त्यात दरवर्षी सेवानिवृत्त होणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याने हे मनुष्यबळ अपुरे आहे. त्यामुळे सुरक्षारक्षक वाढविण्याची मागणी सुरक्षा विभागाने केली आहे.



गेल्या वर्षी महापालिकेने १,५६५ कंत्राटी सुरक्षारक्षकांसाठी एका वर्षाची निविदा काढली होती. या निविदेची मुदत संपून सुमारे तीन महिने उलटून गेले आहेत. मुदत संपण्यापूर्वी प्रशासनाने नवीन ठेकेदार नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरु केली नव्हती. सुरक्षारक्षकांचे कंत्राट संपून तीन महिन्यांची मुदतवाढ घेण्यात आली होती. आता हे कंत्राटी सुरक्षारक्षक नेमण्यासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. सुरक्षारक्षकाची निविदा एका वर्षासाठी न काढता ती थेट तीन वर्षासाठी काढण्याचा निर्णय घेण्यात आला. या निविदेत १,५६५ कर्मचारी पुरविण्यासाठी एका वर्षासाठी ४६.६४ कोटी रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला आहे. याप्रमाणे तीन वर्षासाठी १३९.९२ कोटी रुपये खर्च येणार आहे. या निविदेसाठी अटी आणि नियमही निश्चित केले आहेत. निविदेची रक्कम वाढल्याने यासाठी ठराविक ठेकेदार पात्र ठरणार आहेत.

पालिकेच्या सुरक्षा विभागाकडे सुरक्षारक्षक म्हणून नेमणूक करण्यासाठी राजकारण्यांकडून तसेच माजी नगरसेवकांकडून दबाव टाकला जातो. त्यांच्या मागणीनुसार रक्षकांची नेमणूक केल्यानंतर त्यांनी मनमर्जी आणखी वाढून या सुरक्षारक्षकांचा उपयोग खासगी कामासाठी केला जात असल्याचे अनेक वेळा उघडकीस आले आहे. आता हे कंत्राट घेण्यासाठी राजकारण्यांनी फिल्डिंग लावली आहे. हे कंत्राट सलग तीन वर्षे मिळणार असून अनेक राजकारण्यांचा यात रस निर्माण झाला आहे.

### ठराविक ठेकेदारांच्या लाभासाठी काढली जातेय तीन वर्षांची निविदा

- तीन वर्षांपूर्वी महापालिकेत सुरक्षारक्षकाची निविदा थेट सात वर्षाच्या मुदतीसाठी काढण्याचा प्रयत्न झाला होता. त्यासाठी एका आमदाराने महापालिकेत राजकीय वजन वापरले होते. पण तत्कालीन विरोधकांनी त्यास विरोध केल्याने हा डाव हाणून पाडला होता. त्यानंतर एक वर्षाच्या मुदतीची निविदा काढण्यात आली होती. आता प्रशासनाने तीन वर्ष मुदतीची निविदा काढली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा एकाच ठेकेदाराच्या हातात कारभार गेल्यास कर्मचाऱ्यांना दोन-तीन महिने उशिराने पगार देणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवता न येणे असे प्रकार घडण्याची शक्यता आहे. निविदा संपण्यापूर्वीच पुढील निविदा काढण्याची प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे, तसेच आदेशही प्रशासनाने काढले आहेत. पण त्याकडे दुर्लक्ष करून ठराविक ठेकेदारांच्या लाभासाठी तीन वर्ष मुदतीची निविदा काढली जात आहे.